


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२० नोव्हेंबर २०२४

## भाजपाचा हा नोट जिहाद, बाटेंगे और जितेंगे : उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, विरार :** विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. या निवडणुकीसाठी बुधवारी (२० नोव्हेंबर) राज्यात मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलं आहे. पण असं असतानाच आज विरारमध्ये मोठ्या घडामोडी घडल्या. विरारमधील एका हॉटेलमध्ये भाजपाचे नेते विनोद तावडे हे पैसे वाटत असल्याचा गंभीर आरोप बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर आणि आमदार क्षितीज ठाकूर यांनी केला. या आरोपानंतर बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्ते आणि भाजपा कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाल्याचंही पाहायला मिळालं.



जवळपास तीन ते चार तास हा संपूर्ण गोंधळ सुरु होता. मात्र, या गोंधळानंतर विनोद तावडे यांनीही हे सर्व आरोप फेटाळून लावले. दरम्यान, यावर विरोधकांनी भाजपावर टीकेची झोड उठवली आहे. या संपूर्ण प्रकरणाबाबत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया देत भाजपावर हल्लाबोल केला. भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचा हा 'नोट जिहाद' आहे, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला.

**उद्धव ठाकरे काय म्हणाले?**

पैसे वाटतानाचा व्हिडीओ समोर आल्यानंतर हे कोणी पाहिलं पाहिजे? निवडणूक आयोगाने पाहिलं पाहिजे. काल अनिल देशमुख यांच्यावर हल्ला झाला. त्यानंतर आज पैसे वाटतानाचे काही व्हिडीओ समोर आले.

त्यामुळे हे जादुचे पैसे कोठून आले? कोणाच्या खिशात जात होते? आता देखील माझी बॅग तपासली गेली मग त्यांच्या बॅगांची तपासणी कोण करणार? निवडणूक आयोगाने यावर कठोर करावाई केली पाहिजे. अन्यथा निवडणूक आयोगावर कारवाई करण्यासाठी आम्हाला काहीतरी वेगळा मार्ग शोधावा लागेल. फक्त गुन्हा दाखल होऊन आरोपी फरार नाही झाले पाहिजेत. मला अशी माहिती मिळाली की काल नाशिकमध्येही पैसे वाटताना काहीजण फरार झाले. पण निवडणूक आयोगाने कारवाई केली पाहिजे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

विनोद तावडे जर का तावडीत सापडले असतील तर त्यांनी आतापर्यंत सरकारं कशी पाडली असतील आणि कशी बनवली असतील? याचा हा पुरावा आहे. महाराष्ट्राने हे पाहिले पाहिजे की आमच्या योजना आहेत त्या कशा फसव्या आहेत. एका बाजूला लाडक्या बहिणींना १५०० रुपये आणि यांना पैशांच्या थप्प्या चालल्या आहेत. हे जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. भाजपा, शिंदे आणि अजित पवारांचा हा 'नोट जिहाद' आहे का? म्हणजे भाजपाचा हा नोट जिहाद आहे, बाटेंगे और जितेंगे असं काही तरी. याचा छडा लागला पाहिजे, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## विरारमध्ये भाजप-बविआ संघर्ष ; विनोद तावडे यांच्यावर ५ कोटींच्या वाटपाचा आरोप

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१९, वसई :** राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सोमवारी सांगता झाली असून बुधवारी मतदान होणार आहे. मात्र मतदानापूर्वीच विरार येथे भाजप आणि बहुजन विकास आघाडी (बविआ) यांच्यात जोरदार संघर्ष उफाळला आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी हॉटेलमध्ये ५ कोटी रुपयांचे वाटप केल्याचा गंभीर आरोप बविआचे नेते हितेंद्र ठाकूर यांनी केला आहे.



मंगळवारी विरार पूर्वेला मनोरीपाडा येथील हॉटेल विवांता येथे तावडे यांच्या उपस्थितीत बैठक सुरू असल्याची माहिती बविआ कार्यकर्त्यांना मिळाली. यावेळी तावडे यांच्यासोबत भाजप उमेदवार राजन नाईक व अन्य पदाधिकारीही उपस्थित होते. बविआ कार्यकर्त्यांनी हॉटेलमध्ये प्रवेश करत तावडे यांच्यावर पैसे वाटप केल्याचा आरोप केला. या आरोपांमुळे भाजप व बविआ कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वादावादी झाली, जी हाणामारीपर्यंत पोहोचली. वादाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि दोन्ही गटांना शांत केले.

पोलिसांनी हॉटेलमधील तपासणीदरम्यान दोन डायऱ्या जप्त केल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, यात नेमके काय आढळले याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. वृत्तवाहिन्यांशी बोलताना हितेंद्र ठाकूर यांनी तावडे यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांनी म्हटले की, तावडे हे मतदारांना पैसे वाटत होते. प्रचार संपल्यानंतरही ते मतदारसंघात कसे आहेत? मतदानाच्या ४८ तास आधी बाहेरच्या नेत्यांनी मतदारसंघ सोडणे बंधनकारक आहे. तसेच, तावडे यांनी या प्रकरणावर पडदा टाकण्यासाठी फोन करून दबाव टाकल्याचाही आरोप ठाकूर यांनी केला. या आरोपांवर भाजप नेते अतुल भातखळकर यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, विरोधकांना आपला पराभव दिसत असल्याने ते खोटे आरोप करत आहेत. तावडे यांच्यावर लावलेले आरोप तथ्यहीन असल्याचे त्यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीसाठी अवघे काही तास शिल्लक असताना अशा प्रकारच्या आरोप-प्रत्यारोपांमुळे राजकीय वातावरण तापले आहे. या घटनेमुळे विरारसह राज्यभरात चर्चेला उधाण आले आहे.

## आज मतदान ! हजारो कर्मचारी निघाले मतदान केंद्रांकडे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, : बुलढाणा :** जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी उध्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी जिल्हा प्रशासन आणि निवडणूक यंत्रणांनी जय्यत तयारी केली आहे. आज मंगळवारी मतदान साहित्यासह हजारो मतदान अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस कर्मचारी निर्धारित मतदान केंद्राकडे रवाना झाले आहे.

जिल्ह्यातील बुलढाणा, चिखली, मलकापूर, मेहकर, जळगाव जामोद, खामगाव, सिंदखेडराजा मतदारसंघात मिळून ११५ उमेदवार रिंगणात उभे आहे.यात सहा प्रमूख पक्ष, वंचित बहुजन आघाडी, बसप, नवीन पक्ष आणि मोठ्या संख्येतील अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. या उमेदवारांचे भाग्य उद्या होणाऱ्या मतदानानंतर मशीन बंद होणार आहे. एकूण २२८८ मतदान केंद्रावरून सकाळी ७ ते संध्याकाळी६ वाजेदरम्यान मतदान पार पडणार आहे. यासाठी कमीअधिक ११ हजार अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले. याशिवाय तीन हजार पोलीस अधिकारी कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहे. सिंदखेडराजा मध्ये सर्वाधिक ३४९ मतदान केंद्र आहे. मलकापूर मतदारसंघात ३०४, बुलढाणा मतदारसंघात ३३१ चिखली मतदारसंघात ३१२ ,मेहकर म तदारसंघात ३२६ सिंदखेडराजा मतदारसंघात ३४९, खामगाव मतदारसंघात३१८ तर जळगाव जामोद मतदारसंघात ३१५ मतदान केंद्र आहे.

यातील ४७९ मतदान केंद्र शहरी भागात तर १८०९ मतदान केंद्र ग्रामीण भागात आहेत. जिल्ह्यातील एकूण २१ लाख ३४ हजार ५२० मतदार आहे. यामध्ये ११लाख ०९ हजार ७९१ पुरुष १० लाख २४हजार ६७१महिला मतदारांचा समावेश आहे.



आज १९ नोव्हेंबर रोजी दुपारी मतदान यंत्र, साहित्य घेऊन अधिकारी कर्मचारी आणि पोलीस नेमून देण्यात आलेल्या मतदान केंद्राकडे रवाना झाले आहे. त्यापूर्वी त्यांना मतदान प्रक्रियेबध्दल संबधित उपविभागीय अधिकारी (महसूल) , आणि तहसीलदार यांनी मार्गदर्शन करून उपयुक्त सूचना आणि निर्देश दिले.

**२६८ एसटी बस दिमतीला**

दरम्यान उध्या होणाऱ्या मतदानासाठी विविध विभागाची वाहने, खाजगी वाहने , शैक्षणिक संस्थांची वाहने आणि एसटी बस यांचा वापर करण्यात येत आहे. भरारी पथक, मतदान कर्मचारी, मतदान साहित्य यांची ने आन करण्यासाठी ही वाहने वापरण्यात येणार आहे राज्य परिवहन मंडळाच्या २६८ बस कर्मचारी आणि साहित्य वाहतूक साठी वापरण्यात येत आहे.

**मतदानासाठी १२ ओळखपत्र ग्राह्य**

ज्या मतदारांचे नाव मतदार यादीत आहे अशा मतदारांचे मतदार कार्डव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. या १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणताही एक पुरावा दाखवून मतदारांना मतदान करता येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणुकीसाठी ज्या म तदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. ज्या मतदारांकडे मतदार ओळखपत्र नाही, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.या १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

**मतदानासाठी सुट्टी...!**

नागरिकांना हक्क बजावता यावा यासाठी राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सर्व मतदारसंघातील कामगारांना म तदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी द्यावी, असे आदेश जिल्हा निवडणुक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य

**दि.१९, ठाणे :** विधानसभा निवडणूकीसाठी दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार असून मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे मतदारयादीत नाव आहे, अशा मतदारांकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदान करता येणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्रा व्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

एखाद्या मतदाराने मतदारयादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती – चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील ६ हजार १५५ मतदान केंद्रे मतदानासाठी सज्ज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, ठाणे :** बुधवार, दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०२४ ची मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या मतदान प्रक्रियेसाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून आज ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी यंत्रणा रवाना झाली आहे. तरी नागरिकांनी दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी ७.०० ते सायं. ६.०० वाजेपर्यत मतदान करुन आपला लोकशाहीचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

आज १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदानकेंद्रावर लागणाऱ्या साहित्याचे वाटप मतदान केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांना करण्यात आले. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात एकूण ६ हजार ८९४ ही मूळ मतदान केंद्रे व ६१ सहायकारी मतदान केंद्रे अशी एकूण ६ हजार ९५५ मतदान केंद्रे असून या मतदान केंद्रांवर एकूण ८ हजार २७३ बॅलेट युनिट, ८ हजार २७३ कंट्रोल युनिट तर ८ हजार ९६२ व्हीव्हीपॅट रवाना झाले आहे. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, तीन मतदान अधिकारी, एक शिपाई व पोलीस कर्मचारी असे पथक मतदानाच्या दिवशी कार्यरत असणार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ६ हजार ९५५ मतदान केंद्रावर एकूण ७ हजार ७१७ मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी १– ७ हजार ७१७, इतर मतदान अधिकारी – १५ हजार ४३४ अशा एकूण ३० हजार ८६८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात सखी, दिव्यांग व युवा ही तीन नाविन्यपूर्ण मतदान केंद्र असून ही सर्व मतदान केंद्रे सज्ज झाली आहे. सर्व केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष हे सर्व सामान घेवून पोहचले असून मतदानाच्या दिवशी सकाळी ६.०० वा. मॉकपॉल घेवून ईव्हीएम, व्हीव्हीपॅट, बॅलेट युनिट ही सर्व यंत्रे सुरळीत चालत असल्याची खात्री करुन घेतली जाणार आहे. त्यानंतर सर्व मशीन्स क्लीअर करुन सकाळी ७.०० वा. मतदान प्रक्रियेस सुरूवात होणार आहे. मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा देखील सज्ज झाली असून सर्व मतदान केंद्रावर पोलीस कर्मचारीही हजर झाले आहेत.

जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील एकूण ६ हजार ९५५ पैकी म हापालिका हद्दीतील ५ हजार ८२१ तर ग्रामीण भागातील ७१४ मतदान केंद्रावर वेबकास्टिंगची सुविधा असणार आहे. तसेच मतदारांसाठी रांगेमध्ये खुर्च्यांची व्यवस्था, ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअरची सुविधा, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.

एकूणच मतदान प्रक्रियेसाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली असून मतदान केंद्रावर सर्व प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

# संडास नाही घरी: तेथे का देता पोरी?

आज पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया नियोजित व अनियोजित क्षेत्रात काम करू लागल्या आहेत. मंदिरे, धार्मिक स्थळे, मार्केट, विविध वस्तू विक्रीचे रोड मार्केट, बाजार अगदी, रांगोळीपासून ते अनेकविध वस्तू विक्रीसाठी स्त्रिया घरापासून तास न् तास दूर राहतात. तेव्हा मलमूत्र विसर्जनाची गरज भागणार कशी? किती व कशी सोसायची ही हालअपेष्टा? ती मूलभूत गरजांपासून इतकी उपेक्षितच असू नये. निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांसाठी प्रसाधनगृह हेसुद्धा स्वच्छ भारत अभियानात आवर्जून समाविष्ट झाले पाहिजे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन आणि ते दाबून, कुचंबून ठेवणे, आरोग्यास किती हानीकारक? स्त्रियांचे आरोग्य व शारीरिक सुदृढता महत्त्वाची, तसेच मानसिक कुचंबणा टाळणे मोलाचे म्हणून स्त्रियांसाठी घरीदारी प्रसाधनगृहे हवीच आहेत. ती तशी सार्वत्रिक हवी. सार्वजनिक व कौटुंबिक स्तरावर प्रथम प्राधान्याने प्रसाधनगृहे उभारावीत. त्यातच शौचालय नसल्याने स्त्रियांच्या मासिक धर्माच्या काळात किती हाल होतात? ते विचारूच नका. म्हणे, आपण आता प्रगतशील अर्थव्यवस्थेच्या टप्प्यावर आहोत. प्रगत, आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान, विकासाचे टप्पे पार करताना स्त्री प्रसाधनगृहाचा विषय इतका गंभीर असू नये, ही थोडी थोडकीच लज्जास्पद बाब असेल का?

विश्व मलमूत्र विसर्जन व्यवस्थापन दिन- जागतिक शौचालय दिन ही नैसर्गिक गरज आहे. आरोग्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व वारंवार अधोरेखित केले जाते; पण ती उघड्यावर करण्याची क्रिया नसून त्यासाठी प्रसाधनगृह हवे, हे मान्य असूनही त्याबाबत प्रचंड अशी उपेक्षा व स्त्री प्रसाधन गृहाकडे तर नको तितके दुर्लक्ष होत आहे. शासनाने स्वच्छ भारत अभियान सुरू केले; मात्र माणसाच्या मलमूत्र विसर्जनासाठी बंदिस्त सोय असण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. शरीर जीवनशैलीची ही अविभाज्य अशी प्रक्रिया होय. तो संवेदनशील असा विषय आहे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन करणे सार्वजनिक अनारोग्याला, साथीच्या रोगांना निमंत्रणच जणू काही! हा दिन मलमूत्र विसर्जनाचे व्यवस्थापन व देशापुढील आरोग्याशी निगडीत आहे. त्याबद्दलची अनास्था, उपेक्षा आणि योग्य ती दखल घेण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष, अशी स्थिती आज आपल्या समाजात विशेषतः ग्रामीण निम्नशहरी भागात आहे, हे दुर्दैव होय. १९ नोव्हेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघातर्फे जागतिक शौचालय दिन म्हणून जाहीर करण्यात आला आहे. या दिवशी स्वच्छतेचे महत्त्व पटवून घ्यावे व द्यावे. नैसर्गिक गरज भागविली जावी, म्हणून या दिनाचे प्रयोजन करण्यात आले.

विश्व प्रसाधनगृह दिन हा आपल्याला आपल्या जीवनात स्वच्छता किती महत्त्वाची आहे, याची आठवण करून देतो. आपल्या परिसरातील स्वच्छता व्यवस्था सुधारण्याचे अनेक मार्ग आहेत आणि आपण त्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जागतिक शौचालय दिवस जसजसा जवळ येत आहे, तसतसे आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की ज्यांना अस्वच्छ सांडपाणी व्यवस्थेचे विविध धोके माहित नाहीत त्यांना सांगणे आवश्यक आहे. मानवी कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून त्यातून कोणतेही आजार होऊ नयेत. मानवी कचऱ्याचे कंपोस्ट खत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण कचऱ्यामुळे अनेक गुंतागुंती निर्माण होतात. या दिवसांत ग्रामीण भागात राहणाऱ्या अनेक लोकांपर्यंत पोहोचण्याची आणि त्यांना शौचालये आणि स्नानगृहे बांधण्यासाठी मदत करण्याची गरज आहे. योग्य स्वच्छता व्यवस्थेशिवाय असे लाखो मार्ग आहेत, ज्याद्वारे रोग पसरू शकतात. जागतिक शौचालय दिनाचे मुख्य उद्दिष्ट आहे, की या रोगांवर कोणत्या मार्गांनी सामना केला जाऊ शकतो, यावर चर्चा करणे होय. भारतात मोठमोठ्या देवालयापेक्षा शौचालयांची अत्याधिक आवश्यकता भासत आहे. आज भारतात कित्येक स्त्री-पुरुषांना असुविधेमुळे उघड्यावर शौचास बसावे लागते. त्यामुळे रोगराई मोठ्या प्रणावर फैलावते. जेंडर बजेटमध्ये लाखोंची तरतूद होऊनही कधी प्रशासनाची टाळाटाळ तर कधी वित्तीय संकटामुळे लोक शौचालय बांधत नाहीत. ही महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारतासाठी दुर्दैवी बाब ती कोणती असू शकेल? सुज्ञ पालकाने आपली लाडकी मुलगी संडास नसलेल्या घरी मुळीच देऊ नये. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १९ नोव्हेंबर हा दिवस जागतिक शौचालय दिन म्हणून जाहीर केला आहे. जगभर या दिनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. महाराष्ट्रात सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी गडांगडावर शौचालय बांधले होते. महाराष्ट्र संताची भूमी आहे. अनेक थोर महात्मे महाराष्ट्रात घडून गेले आहेत. त्यापैकीच एक संतश्रेष्ठ गाडगेबाबा होते. स्वच्छतेचे महत्त्व सर्वप्रथम त्यांनी समाजाला पटवून दिले. त्यांनी स्वत: हातात झाडू घेऊन रस्त्यावरची घाण साफ केली. रात्री किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील धूळ, घाण, कचरा साफ केले. ते खरे स्वच्छतादूत व स्वच्छतेचे पुजारी होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र म्हणजे स्वच्छ अशा बंदिस्त संडासमध्ये मलमूत्र विसर्जनाची व्यवस्था असणे होय. परंतु सुमारे ४० टक्के लोकांना शौचालयाची सुविधा नसणे वा त्याचा वापर न करणे अशी स्थिती आहे. सरकारी आकडेवारीनुसार देशात ११० दशलक्ष शौचालयांची गरज आहे. ग्रामीण निम्नशहरी भाग, झोपडपट्टी, जुन्या वसाहती, डोंगर भागात वाड्या-वस्त्या वगैरेमध्ये शौचालयाची उपलब्धता नाही. उघड्यावर शौचास बसणे, हाच शिरस्ता आजतागायत चालू आहे. पाणंद, ओढा, नदी, टेकडी, झाडे-झुडपे वगैरेचा आधार घेत स्त्रिया मलमूत्र विसर्जन करतात. पुरुष समोर दिसला, की उभे राहणे हेच अपरिहार्य कर्म झाले आहे. स्त्रियांसाठी शौचालय नसणे, ही अत्यंत अन्यायकारक अनारोग्यी बाब होय. शहरी भागात कॉमन शौचालयाची व्यवस्था असते, तीही अपुरी व अस्वच्छच. त्यातच स्त्रियांच्या स्वभावानुसार त्या रांगेत उभे राहण्यास टाळाटाळ करतात. शिवाय सकाळी कामाची गडबड असते. मग ही नैसर्गिक गरज कुचंबून मारली जाते. त्यात आजारग्रस्त स्त्रिया, गरोदर माता, तरुण मुली यांची तर फारच गैरसोय होत आहे. ग्रामीण परिसरांमध्ये पारंपारिक मलनिस्सारण पद्धतीकरिता होणारी मोठी भांडवली गुंतवणूक, न परवडणारी देखभाल, व्यवस्थापन खर्च, पाण्याचा अपुरा पुरवठा, विखुरलेल्या वस्त्या व गावे आदींमुळे शक्य होत नाही. शहरी भागात प्रसाधनगृहे वाढत असूनही अक्षम्य असे दुर्लक्ष होत आहे, तेही विशेषतः स्त्रियांसाठी प्रसाधनगृह उभारणीमध्ये. व्यक्तिगत आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता, सामाजिक आत्मसन्मान रक्षण व प्रगतिशील राष्ट्र म्हणवून घेण्याच्या या टप्प्यावर तर सर्वांसाठी प्रसाधनगृहे ही अत्यावश्यक गरज मानली जावी. स्त्री-पुरुष समानता, स्त्रीमुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्या, या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था आदी या समानतेचा लढा देताना शासनावर दबाव टाकण्याचा म्हणूनच प्रयत्न करतात. त्यामध्ये वास्तविक स्त्री प्रसाधनगृहाची नितांत आवश्यकता, हा विषय प्रथम प्राधान्याने घ्यायला हवा. शिवाय जनजागृती, समाजप्रबोधन, कौटुंबिक समपदेशन, स्त्रीपुरुष समानता विषयक कायदे आणण्याचा लढा देताना स्त्रियांचे मूळ दैनंदिन जीवन जगण्याचे प्रश्न महत्त्वाचे मानून प्राधान्य द्यायला हवे. समानतेचा नारा देताना मुळातच स्त्री जीवन सुसह्य, सोसीक व सुखावह कसे होईल, हे पाहायला हवे. त्या दृष्टीने स्त्री प्रसाधनगृह हा प्रश्न मोलाचा आहे, याचे भान त्या चळवळीने व शासनानेसुद्धा ठेवावे, ही अपेक्षा!

**!! विश्व शौचालय दिनाच्या सर्वांना अनुवर्तनास्तव आठवडाभर हार्दिक शुभेच्छाजी !!**

**- संकलन -**
**श्री.कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी,**
**गडचिरोली**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

## संपादकीय



### चला.... मतदान करूया !

विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून राज्यभरात उत्साहाचे वातावरण आहे. मतदारांना आकृष्ट करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराने आपल्या मतदार क्षेत्रातील गल्ली-बोळा पिंजून काढला आहे. नानाविध आश्वासने दिली आहेत,आजतागायत झालेल्या प्रचाराच्या व्याप्तीवरून पक्षाच्या प्रमुख मंडळींनी यश-अपयशाची गणिते मांडण्यासही सुरुवात केली आहे. यंदा पक्ष आणि उमेदवार यांच्याकडून प्रचारासाठी जीवाचे रान केले गेले असले, तरी मतदान करण्यासाठी मतदार किती प्रमाणात घराबाहेर पडतात यावरून पक्षांचे भवितव्य ठरणार आहे. समस्त सरकारी यंत्रणानी मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत. विविध माध्यमांतून जागृतीही केली आहे,. मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे ही शहरे दाट लोकवस्तीची असल्याने या ठिकाणी उभारण्यात येणारी मतदान केंद्रे नागरिकांच्या घरापासून जेमतेम एक किलोमीटरच्या अंतरात असतात. तरीही अनेक नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर पडण्यास, मतदानासाठी रांग लावण्यास इच्छुक नसतात हें लोकसभा निवडणुकीच्या वेळी निदर्शनास आले. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदानाचा टक्का घसरला होता तरी काही गोष्टींचे कौतुकही वाटत होते. वयाची शंभरी गाठलेले काही जेष्ठ नागरिक मतदानासाठी बाहेर पडले होते, तर काही ठिकाणी अधू, अपंग नागरिकांनीही उत्साहाने मतदान केलेले दिसून आले. नोकरी व्यवसायानिमित्त देशाबाहेर गेलेले काही नागरिक केवळ मतदान करण्यासाठी हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतात आले होते. या सर्वांचा उत्साह पाहिल्यावर जे नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर पडत नाहीत, मतदानानिमित्त मिळालेल्या सुट्टीचा उपयोग मौजमजा करण्यासाठी आणि सहलीला जाण्यासाठी करतात त्यांची लोकशाही उपभोगण्याचीच पात्रता नाही असे वाटते. समाजस्वास्थ उत्तम राहिले, तर आपण सुरक्षित राहू शकतो, सुखाने जगू शकतो आणि समाजस्वास्थ नियंत्रित राखण्याचे महत्वाचे कार्य सरकार करत असते. नागरिकांना आवश्यक सुविधा पुरवणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, महागाई नियंत्रित ठेवणे, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या जीविताची काळजी घेणे, सामाजिक सलोखा राखणे, मानवी हक्कांचे रक्षण करणे, कायदा आणि सुव्यवस्था राखणे यांसारख्या महत्वाच्या बाबींमध्ये सरकारची भूमिका महत्वाची ठरते आणि हे राज्याचे सरकार कोणाचे असावे हे ठरवण्याचा सर्वस्वी अधिकार राज्यातील नागरिकांचा असतो जो मतदानाच्या माध्यमातून त्यांनी बजावणे अपेक्षित असते. मतदान म्हणजे कोण्या राजकीय नेत्यावर किंवा पक्षावर उपकार करणे नव्हे, तर आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधेसाठी योग्य सरकारची निवड करणे ही भावना लोकांमध्ये केव्हा जागृत होणार ? आपल्या, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या म्हणजेच राज्याच्या आणि देशाच्या भवितव्यासाठी आपले एक मतही बहुमोल कामगिरी करणारे ठरणार आहे त्यामुळे निरुत्साह झटकून मतदान करण्यासाठी घराबाहेर पडूया !

## आज, उद्या शहरातील काही मार्ग वाहतुकीसाठी बंद

**दि.१९, नाशिक :** बुधवारी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी आवश्यक असणारे मतदान साहित्य यंत्रणेकडून देण्यात येणार असल्याने साहित्य, निवडणूक अधिकारी आणि अन्य काही वस्तुंची ने-आण करण्यासाठी होणाऱ्या वाहतुकीमुळे कोंडी हाऊ नये, यासाठी नाशिक वाहतूक पोलिसांकडून वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत. विधानसभा निवडणुकीतील मतदानासाठी मतदान साहित्य देण्यासाठी मंगळवारी तसेच बुधवारी मतदान झाल्यानंतर ते पुन्हा जमा करण्यासाठी नाशिक पूर्व, पश्चिम, मध्य, इगतपुरी या मतदारसंघांसाठी शहरातील काही ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. सामान तसेच निवडणूक प्रक्रियेत सहभागी अधिकारी, कर्मचारी यांची ये-जा करण्यासाठी होणारी वाहतूक पाहता कोंडी होऊ नये, यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय केंद्राकडे येणाऱ्या रस्त्यावरील वाहतूकीत बदल करण्यात आला आहे.

## कर्जाला कंटाळून मनपा अधिकाऱ्याची आत्महत्या

**दि.१९, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगर पालिकेचे अधिकारी मनोहर गांगुर्डे यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. हि घटना शनिवारी समोर आली असून कामोठे पोलीस अधिक तपास करीत आहेत. नवी मुंबई महानगर पालिकेच्या ऐरोली विभाग कार्यालयात प्रशासन अधिकारी म्हणून मनोहर गांगुर्डे हे कार्यरत होते. ते स्वतः कामोठे सेक्टर १६ येथील प्रेमअंबरसोसायटीत राहत होते. त्यांनी शुक्रवारी अपरात्री याच ठिकाणी गळफास घेत आत्महत्या केली आहे. ते दरवाजा उघडत नसल्याचे समोर आल्यावर या बाबत शेजाऱ्यांनी पोलिसांना माहिती दिल्यावर पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केल्यावर त्यांनी गळफास घेतल्याचे दिसून आले.

### या मतदाना..

अवश्य या मतदानां
आग्रहाचे आमंत्रण
घरच्या कार्यक्रमांस
घरातल्यांस निमंत्रण

आपल्या स्वागताला
आपणबांधले तोरण
कुणाचेहाती सुकाणूं
चला ठरवू या धोरण

आपल्या सु भविष्या
चला करा उध्दारण
अभिमानेकर्तव्यपूर्ती
स्वता बनले उदाहरण

जराशा आळसापोटी
ना निर्भरते चिरहरण
स्तोम नको गुंगत्वाचे
इतर कामाचे विवरण

मतदान पावन दिवस
नको कर्तव्यविस्मरण
शाई हवींचं बोटाला
एक दुजा देई स्मरण

खोटे नाटे उगाकारण
प्रमादा नको आवरण
सोनसंधीलोकशाहीत
गंडस्थळावर नियंत्रण

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# आद्य कर्तव्य भारतीयांचे - 'पवित्र कार्य मतदानाचे'



**लोकांनी लोकांकरिता लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी म्हटले आहे. लोकशाही टिकवायचे असेल तर जास्तीत जास्त शंभर मतदान व्हावे.**

अशी अपेक्षा आहे. परंतु अलीकडे मतदानाची टक्केवारी घसरलेली आहे. साक्षर लोक असून सुद्धा मतदान करायला जात नाहीत, ही खेदाची बाब आहे. आज निवडणुकीत मतदान करणे अतिशय महत्त्वाचे आहे. दानात दान मतदान हे श्रेष्ठ आहे, हे कळून सुद्धा अनेक लोक मतदान करत नाहीत. मतदान करते वेळेस मतदारांनी जागरूकतेने मतदान करावे. आपला, जवळचा नातेवाईक, मित्र असं न पाहता त्याचे कर्तृत्व पाहून मतदान करावे. आपले मतदान वाया जाऊ नये. आपलं मतदान देशाच्या विकासासाठी, कल्याणासाठी प्रजेच्या हितासाठी दिलं जावे. तर त्या मतदानाला अर्थ आहे. मतदान करते वेळेस कोणत्याही व्यक्तीच्या दबावाखाली येऊन मतदान करू नये. मतदान करताना सर्वाच्या हिताचा राष्ट्राचा विचार करून आपण मतदान करावे, तेव्हा या देशातील दहशतवाद, वसाहतवाद, प्रांतवाद मिटेल. ज्यावेळेस तुम्ही एका चांगल्या व्यक्तीला निवडून देता त्यावेळेस तो संविधानानुसार चालेल. त्यामुळे सर्वांना जात-पात, लिंग, भेद, वंश विसरून तो समानतेने निधी वाटप करील.सगळ्यांना बरोबर घेऊन चालेल तेव्हा जागृत मतदारांनी आपले मत विकासाला द्यावे.

जर तुम्ही चुकीच्या माणसांना मतदान करून टाकले तर तो उद्या गुंड प्रवृत्तीने वागेल, नंतर तो तुम्हाला त्रास देईल ?तो त्याच्या बळावर तुमचे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय हिरावून घेईल. त्याची फळे तुम्हाला अनेक वर्ष भोगावे लागतील. म्हणून तुम्ही जागरूकतेने मतदान करा. घराणेशाही, गुंडशाही या गोष्टीचा विचार करताना या घराण्यांनी खरोखरच देशाच्या विकासासाठी काय काय कार्य केलेले आहे. याची जाणीव असू द्यावे. सर्वच घराणे वाईट नाहीत हे या ठिकाणी सांगणे गरजेचे आहे. आपण मतदार आहोत, मतदार हा राजा असतो, कोणाची सत्ता उलथून टाकायची किंवा कोणाला डोक्यावर घेऊन नाचायचे हे मतदाराच्या हातात असते. त्यामुळे तुम्ही कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. एकत्रित या आणि शंभर टक्के मतदान करा. मतदानाच्या दिवशी सुट्टी घेऊन मौजमजा करू नका. तीर्थक्षेत्रांना भेटी देणे. मित्रांच्या घरी जाणे. पार्टी करणे किंवा आराम करणे या गोष्टी न करता आपले मतदान ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी तुम्ही जाणे अतिशय गरजेचे आहे. म्हणून...

**मतदार राजा जागा हो।**

**लोकशाहीचा धागा हो** असे म्हटले जाते. धाग्या धाग्यांनी कापड विणले जाते आणि तेच कापड मनुष्याची इज्जत वाढवते. तसे एक एक मतदान करून देशाला विकासाकडे नेता येते आणि मतदान पेटीतून गुंड प्रवृत्ती असणाऱ्या लोकांना घरी बसवले जाते. एवढी ताकद या मतदानामध्ये आहे.

म्हणून आज शासनाने शाळा, कॉलेज महाविद्यालयातून रॅली काढून जनजागृती करून पथनाट्यातून, भारुडातून लोकांना समजावून सांगितलेले आहे. की तुझे हे मतदान अतिशय मौलिक आहे. त्यामुळे तुम्ही मतदान करा. ज्या व्यक्तीचे वय जास्त झालेले आहे. अशा लोकांचे मतदान घरी जाऊन शासनाने घेतलेले आहे.

हे फार मोठी लोक चळवळ आहे.हा लोकशाहीचा उत्सव आहे. त्यामुळे या उत्सवामध्ये सर्वांनी आनंदाने सहभागी व्हावे. आपल्या मतदारसंघां मध्ये ज्या ठिकाणी आपले नाव आहे. तिथे जाऊन आपण आपल्या मतदानाचा हक्क आज बजवावे. तेव्हा खरे आपण लोकशाहीचे पाईक आहोत असे आपल्याला म्हणता येईल. एकमताने काय होणार? हे तर अजिबात डोक्यात आणू नका. कारण एक एक मत अतिशय मौलिक आहे. आतापर्यंतचे काही खासदार, आमदार एका मताने सुद्धा पराभूत झालेली उदाहरणे आहेत. स्वतः गाडीचा ड्रायव्हरने मतदान न केल्यामुळे तो उमेदवार पराभूत झालेला आहे. क्रिकेटच्या खेळामध्ये एका धावेला जसे अतिशय महत्त्व असते. एका धावेने संपूर्ण देश हारतो किंवा जिंकतो. असेही अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतात. ते आपल्याला माहिती आहे. म्हणून नवोदित मतदारांना मी सांगू इच्छितो की; त्यांनी ज्या उमेदवारांनी आपले विकासाभिमुख कार्य, आपलं भवितव्य, बेरोजगारी किंवा वेगवेगळ्या विकासाच्या संधी देण्याचे वचन दिलेले आहेत. अशाच लोकांना तुम्ही मतदान करावे.नुसत्या आश्वासनावर भुलू नका. त्यांचे अगोदरचे चारित्र्य, कार्य पाहून मतदान करावे. उमेदवार पुरुष आहे की महिला आहे या गोष्टीकडे अजिबात लक्ष देऊ नका, तो किती कर्तृत्वानवान आहे. त्यांचे संस्कार कसे आहेत. ते पाहून योग्य उमेदवाराला मतदान करा . तुम्ही त्यांच्याकडून काहीही घेऊ नका. कारण त्यामुळे आपले चारित्र्य खराब होते. आणि स्वत: कधी ही विकायचे नसते. आपण मानव आहोत? याचीही आपण दखल घ्यावी,म्हणून जागरूक मतदार। लोकशाहीचा आधार असा आपणाला स्पष्ट म्हणता येते. म्हणून मतदार राजा हा सरळ मनाने, ताठ मानेने जीवन जगण्यासाठी आपल्या मतदानाचा अधिकार आजच बजवून राष्ट्र कार्याला हातभार लावावा.

**मताची ताकद ओळखू या।**
**योग्य उमेदवाराची निवड करू या।।**
**जागरूक मतदार।**
**लोकशाहीचा आधार।।**
**म्हणून प्रत्येक पुरुष- महिलांनी मतदान करावे ही अपेक्षा..**

**- प्रा. बरसमवाड विठ्ठल गणपत**
**ता.मुखेड जि. नांदेड**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## तरुण मुलांच्या अपघाती मृत्युने माथेरानवर दुःखाचे सावट




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१८, माथेरान (रायगड) :** हृदय हेलावणारी अतिशय दुःखद घटना आज माथेरान मधे घडली आहे. साधारण १९ /२० वयोगटातील हे तरुण मित्र परिवार साज गावची यात्रा पाहण्यासाठी एमएच ४६ सीएस ४०६६ या एक्टिवा बाईक वरुन गेले होते. दर्शन वेताल, अजय आखाडे, प्रथमेश सोनावणे तिघे एकाच बाईक वरुन गेले होते. यात्रेचा आनंद घेऊन रात्री हे परत येत असताना खोपोली हाल फाटा येथे समोर उभ्या असलेल्या कंटेनर गाडीला ह्यांनी जोरदार ठोकर दिल्याने दर्शन वेतालचां जागीच मृत्यू झाला. तर अजय आखडे याचा हॉस्पीटलला घेऊन जात असताना मृत्यू झाला. तिसरा प्रथमेश सोनावने वर एमजीएम हॉस्पीटलमधे उपचार सूरू आहेत.

आनंदात अति प्रमाणात तरुणाई आत्मघाती निर्णय घेत असतात. एक वेगळा भावना प्रकार जो कधी अनुभवलं नसतो त्याच आनंदाच्या भरात अवलंब करताना दिसतात आणि स्वतःबरोबर संपूर्ण कुटुंबाला संकटात टाकले जाते. सध्या सोशल मीडियावर रील बनवणे, क्लिप टाकणे आणि त्याचे व्ह्यूज मिळवणे यासाठी धाडसी निर्णय घेतले जातात. दुसरा आनंद साजरा करण्याचा मोठा कल तरुणांचा म्हणजे मद्यप्राशन कडे वळला आहे. दंगामस्ती धांगडधिंगा, छेडछाड अशा अनेक घटना होत असतात. यापेक्षा चिंताजनक दारूच्या नशेत गाडी चालवणे, बाईकवर ट्रिपल सीट घेऊन वेगाने चालवणे, यामध्ये यमदूत चौथ्या सीटवर बसलेला असतो. अशावेळी एखादी दुखत घटना घडली त्याला जबाबदार कोण ? जाणारा जातो. पण त्यामागे संपूर्ण कुटुंबाची होणारी मानसिक स्थिती फार भयानक असते. आज माथेरानमध्ये २ तरुणांचा अपघातात मृत्यू झाला, सोशल मीडियावर त्यांचे फोटो आणि भावपूर्ण श्रद्धांजली असे अनेक मेसेज पडत आहेत. परंतु प्रत्येक कुटुंबाने, तरुणाईने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आलेली आहे. सध्या तरुणाईला गुरुची उपदेशाची मार्गदर्शनाची गरज वाटत नाही. राजकारणापेक्षा समाजकारण केल्यास अनेक उपेक्षित घटकांना तुमची मदत मिळेल. तरुणाई म्हणजे मजा मस्ती, किंवा इच्छाशक्तीच्या जोरावर आपली स्वप्नपूर्ती करण्याची धमक असलेली तरुणाई. या मधला फरक प्रत्येक तरुण वर्गाने विचार करण्याची गरज आहे. कारण प्रत्येक जीवन हे मौल्यवान आहे. त्याचे मौल कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईत करता येणार नाही म्हणून जीवनातील प्रत्येक पाऊल जबाबदारीने टाकणे आवश्यक आहे. या जबाबदारीचे पालन झाले तरच जबाबदारी पिढी निर्माण होईल. आणि कुटुंब बहरतील.

## कॅनव्हास स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून केली मतदान जागृती




**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१९, धाराशिव :** लोकशाहीमध्ये प्रत्येक मताचे मोल आहे. याबाबत कळंब येथील, कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूल कळंब. धाराशिव जनजागृती करण्याच्या उद्देशाने विधानसभा मतदारसंघ मतदान जागृती कक्ष विभाग, तहसील कार्यालय, कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले.

कळंब शहरातील बस स्टॅन्ड,छत्रपती शिवाजी महाराज चौक, होळकर चौक, तहसील कार्यालय तसेच मोहेकर महाविद्यालय व बागवान चौक या ठिकाणावर हे पथनाट्य सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या पथनाट्यातून प्रभावी संवाद आणि अभिनयाद्वारे मतदानाचा जागरूकतेचा संदेश दिला. त्यांनी मतदानाच्या अधिकाराचा योग्य वापर करण्याचे आवाहन केले. या पथनाट्यासाठी शाळेतील कलाशिक्षक प्रशांत भोले आणि बाळासाहेब जाधव सर यांनी मार्गदर्शन केले. तर संगीत शिक्षक प्रशांत धावारे व विशाल धावारे सर यांनी उत्तम संगीत साथ दिली, ज्यामुळे सादरीकरण अधिक प्रभावी झाले. प्रसंगी कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूलचे संस्थापक रवी नरहिरे कळंब स्वीप पथकाचे सदस्य सुशील फुलारी, शिक्षण विस्तार अधिकारी प्रशांत गुटे हे उपस्थित होते. यावेळी सुशील फुलारी यांनी प्रस्ताविकामध्ये मतदार जागृती करण्यासाठी याबाबत प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. व पथनाट्यांच्या चमूचे, बालकलाकारांचे कौतुक केले. शाळेचे संस्थापक रवी नरहिरे यांनी मतदान जागृतीसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या पुढाकारांचे विशेष कौतुक केले. आणि उपस्थित नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले.

## २ देशी बनावटी पिस्तूल व ४ जिवंत काडतुस बाळगणाऱ्याला अटक

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१९, कल्याण (ठाणे) :** डोंबिवली पश्चिम विष्णुनगर पोलीस ठाण्याचे हद्दीत बावन चाळ रेल्वे मैदान या ठिकाणी १७ नवंबर २०२४ रोजी गुन्हे शाखा घटक ०३ पो.शि मिथुन राठोड यांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली होती की, एक इसम देशी बनावट पिस्टल विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली होती. सदर मिळालेला माहिती प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे यांनी एक पोलीस पथक नेमून त्या पथकाने त्यांचें मार्गदर्शनाखाली बावन चाळ गणेश मंदिर जवळ सापळा रचून इसम नावे सुधीर रामनिवस ठाकुर वय २२ राह उत्तरप्रदेश यास ताब्यात घेऊन त्यांस कडील ९००००/- रुपयाचे दोन देसी बनावटी पिस्तल आणि ४०००/- रु.चार जिवंत काडतुस असे एकूण ९४०००/-बनावटी दोन पिस्तूल आणि ०४ जिवंत काडतुस त्याच्याकडून मिळाले असून त्याला ताब्यात घेण्यात आलं. बिना परवाना बेकायदेशीर पिस्तूल आणि जिवंत काडतुस पोलीस उपायुक्त विशेष शाखा ठाणे शहर यांच्याकडील मनाई आदेश भंग केल्याने त्याचे विरुद्ध पो.शि मिथुन राठोड नेमणूक गुन्हे शाखा कल्याण०३, यांनी विष्णू नगर पोलीस ठाणे डोंबिवली पश्चिम येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ व मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)१३५ प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची उत्तम कामगिरी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे ठाणे शहर पंजाबराव उगले अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे शिवराज पाटील पोलीस उपायुक्त गुन्हे शेखर बागडे सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध, १ गुन्हे) शाखा ठाणे शहर यांचं मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा घटक ०३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे सपोनी उगलमुगले ,पोउपनि विनोद पाटील पोलीस अंमलदार अनुप कामत, किशोर पाटील, गुरुनाथ जरग, मिथुन राठोड, विलास कडू, या सर्वांनी उत्तम कामगिरी केलेले आहे.

# जिल्ह्यातील १२ मतदारसंघात ३६ ड्रोनची नजर

## प्रशासन सज्ज; मतदार नसलेल्यांवर कारवाई होणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, अहिल्यानगर :** मतदान केंद्र परिसरात मतदारांना पैसे वाटप वा मतदानापूर्वीच बोटाला शाई लावण्याच्या प्रकारांवर कारवाई तसेच केंद्र परिसरात झालेली गर्दी, वाहतूक कोंडी व त्यासाठीच्या नियोजनासाठी मतदान केंद्रांवर ड्रोन कॅमेरांचा वॉच असणार आहे. दरम्यान ज्यांचे जिल्ह्याच्या कोणत्याही मतदारसंघात मतदान नाही, अशांनी जिल्हा बाहेर जाण्याचे आवाहन प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.

यासाठी येत्या दोन दिवसात जिल्ह्यातील लॉज, ढाबे व हॉटेलची विशेष तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. या तपासणीत मतदार नसल्याचे कोणी आढळले तर त्यांच्यावर कारवाई



केली जाणार आहे. जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघांत बुधवार, दिनांक २० नोव्हेंबरला मतदान प्रक्रिया होणार आहे.जिल्ह्यातील ३ हजार ७६५ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे.पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. २१ हजार ५७४ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून मतदारांनी निर्धोकपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ व पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी केले आहे. सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा, स्त्री पुरुषांसाठी स्वतंत्र रांग, रांगेत गर्दी झाल्यास बसण्यासाठी बेंचेस, खुर्च्या, प्रतीक्षालय, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वैद्यकीय सुविधा, गरोदर महिला, वयोवृद्ध व दिव्यांगांसाठी मतदान प्राधान्य व आवश्यक विशेष सुविधा देण्यात आले आहेत.

९९ टक्क्याच्या वर मतदारांपर्यंत मतदार स्लिपा वाटप झालेले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**त्यांच्यावर होणार कारवाई जिल्ह्यातील कोणत्याही मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणी नसलेले व प्रचारा निमित्त जिल्ह्याबाहेरून आलेल्यांनी निघून जाण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. अशांचा शोध घेण्यासाठी जिल्ह्यांतील लॉजेस,ढाबे व हॉटेल यांची विशेष तपासणी मोहीम सुरु करण्यात आली आहे. त्यात आढळणाऱ्या अशा व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. मतदान केंद्रावर झालेली गर्दी, केंद्राच्या परिसरात झालेली वाहतूक कोंडी तसेच पैसे वाटप व बोटाला शाई लावण्याचे व अन्य अनुचित प्रकार रोखण्यासाठी मतदान केंद्र परिसरात ड्रोन कॅमेरा द्वारे निगराणी सुरु राहणार आहे.**

## मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, ठाणे :** विधानसभा निवडणूकीसाठी दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार असून मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे मतदारयादीत नाव आहे. अशा मतदारांकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदान करता येणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्रा व्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

एखाद्या मतदाराने मतदारयादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती – चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास प्रतिबंध - जिल्हादंडाधिकाऱ्यांकडून आदेश जारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, अकोला :** विधानसभा निवडणूकीत अकोला जिल्ह्यातील ५ मतदारसंघांसाठी दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होणार आहे. त्यामुळे अकोला जिल्ह्यात दि. २० नोव्हेंबरला मतदानाची प्रक्रिया संपेपर्यंत विविध निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्याबाबतचा आदेश जिल्हा दंडाधिकारी अजित कुंभार यांनी निर्गमित केला आहे.

मतदान केंद्राध्यक्ष, आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था पथकप्रमुख, निवडणूक सुरक्षा कर्मचारी वगळता इतरांना मोबाईल, स्मार्टफोन, वायरलेस सेट मतदान केंद्रात नेता येणार नाही. या कालावधीत बेकायदेशीर जमाव एकत्र गोळा करण्यास व सार्वजनिक प्रचार सभा आयोजनास बंदी राहील. मतदान पथके मतदान केंद्रावर पोहोचल्यावर मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात ध्वनीक्षेपकाचा वापर यावर पूर्णपणे निर्बंध राहतील. राजकीय पक्ष व उमेदवारांना मतदार अनुक्रमांक, केंद्र आदी अनौपचारिक ओळखचिट्ठ्या केवळ पांढ-या कागदावर मतदारांना देता येतील. त्यावर उमेदवाराचे नाव व निवडणूक चिन्ह असता कामा नये.

मतदान केंद्रापासून २००

मीटरच्या आत असे चिठ्ठीवाटप करता येणार नाही. निवडणूक कर्तव्यावरील वाहने वगळता इतर सर्व वाहनांवर बंदी राहील. मतदान केंद्रात मतदार, उमेदवार व त्यांचे निवडणूक मतदान प्रतिनिधी याव्यतिरिक्त केवळ निवडणूक आयोगाचे प्राधिकारपत्र मिळविलेल्या व्यक्तींनाच प्रवेश राहील.

इतरांना प्रवेशावर बंदी आहे. मतदारांना लाच देणे, गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी करणे, तसेच मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रचार करण्यास बंदी राहील.

मतदारांची ने-आण करण्यासाठी वाहन वापरणे हा अपराध आहे. त्यास पायबंद घालण्यासाठी टॅक्सी, कार, ट्रक, रिक्षा, मिनीबस, व्हॅन, स्कूटर आदींना बंदी राहील. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान केंद्राच्या परिसरात भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे, प्रचार साहित्याचे प्रदर्शन करता येणार नाही. ज्या व्यक्तीला सरकारी सुरक्षा देण्यात आली आहे, अशा व्यक्तीच्या सुरक्षा कर्मचा-यांना केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रवेश करता येणार नाही. सरकारी किंवा खासगी सुरक्षारक्षक असलेल्या व्यक्तीला निवडणूक प्रतिनिधी वा मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यास बंदी आहे.

मतदान केंद्राध्यक्ष, आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था पथकप्रमुख, निवडणूक सुरक्षा कर्मचारी वगळता इतरांना मोबाईल, स्मार्टफोन, वायरलेस सेट मतदान केंद्रात नेता येणार नाही.

**खालील बाबींवर बंदी नाही –** निवडणूक प्रचार दि. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वा. बंद होणार असला तरीही घरोघर (डोअर टू डोअर), प्रचारावर निर्बंध नाही. मात्र, पाच हून अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास प्रतिबंध राहील.

रूग्णालयाची वाहने, रूग्णवाहिका, दुधगाड्या, पाणीपुरवठा वाहने, अग्निशमन बंब, पोलीस, वीज, निवडणूक कर्मचा-यांच्या वाहनांवर बंदी नाही. विहित मार्गाने जाणा-या बसगाड्यांवर बंदी नाही. रेल्वेस्थानक, बसस्थानकाकडे जाणा-या वाहनांवर बंदी नाही. दिव्यांग, आजारी व्यक्तीस मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वैयक्तिक वाहनास किंवा निवडणूक निर्णय अधिका-यांनी दिव्यांगांसाठी नेमून दिलेल्या वाहनास बंदी नाही.

## मतदानासाठी मतदान साहित्य घेऊन पथके रवाना

### निवडणूक निरिक्षकांनी केली मतदान साहित्य वितरण कार्याची पाहणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, वाशिम :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार, दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

मतदानासाठी जिल्ह्यातील वाशिम, रिसोड, कारंजा या विधानसभा मतदारसंघांतील मतदान केंद्रांवर मतदानाचे साहित्य सोबत घेऊन अतिशय उत्साहाच्या वातावरणात कर्मचारी आज रवाना झाले.

दि.१९ नोव्हेंबर रोजी निवडणूक निरीक्षक अनिलकुमार झा यांनी वाशिम येथील कोरोनेशन हॉल, क्रीडा संकुलाच्या बाजूला ठेवण्यात आलेले मतदान साहित्य वितरणाची व व्यवस्थेची पाहणी केली. मतदान केंद्रांवर साहित्य घेऊन जाण्यासाठी सकाळीच कर्मचारी आले होते.

या ठिकाणाहून ईव्हीएम मशीन व मतदान साहित्य, साधनसामग्रींचे निवडणूक विभागाकडून संबंधित पोलींग पार्टीना वितरण करण्यात आले. यावेळी निवडणूक निरीक्षक अनिलकुमार झा यांच्यासमवेत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बुवनेश्वरी एस,



वाशिम निवडणूक निर्णय अधिकारी राजेंद्र जाधव, मंगरूळपीर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शीतल बंडगर, वाशिम सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार निलेश पळसकर आदी यावेळी उपस्थित होते. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांत उत्साह दिसून आला.

# विधानसभा निवडणुकीसाठी किनवटमध्ये प्रशासकीय यंत्रणा सज्ज



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.१९, किनवट (नांदेड) :** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता ८३-किनवट विधानसभा मतदारसंघात बुधवारी (ता.२०) सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान ३३१ मतदान केंद्रावर राखीव यंत्रासह ३९७ नियंत्रण युनिट, ७९४ बॅलेट युनिट व ४३० व्हीव्हीपॅट मतदान यंत्राद्वारे निर्भय, नि:पक्ष व मुक्त वातावरणात मतदान घेण्यासाठी ७०६ पोलिस अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या तैनातीसह ३ हजारांहून अधिक अधिकारी कर्मचारी यांचेसह प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याचे सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मेघना कावली (भाप्रसे) यांनी सांगितले. किनवट व माहूर या तालुक्याचा समावेश असलेल्या या विधानसभा मतदारसंघात १ लाख ४२ हजार २७३ पुरुष, १ लाख ३६ हजार ३८१ स्त्री व ११ ईतर असे एकूण २ लाख ७८ हजार ६६५ मतदार आहेत. ३३१ मतदान केंद्रापैकी सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. २ खोली क्र. २ येथे एक दिव्यांगासाठी आणि जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा माहूर येथे एक महिला मतदारांसाठी व स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतर प्रथमच अतिदुर्गम वाघदरी येथे एक एंग बुध मतदारांसाठी असे ३ स्वतंत्र मतदान केंद्र आहेत.

दिव्यांगासाठीच्या सुलभ निवडणुका अंतर्गत तिथे सर्व सुविधा उपलब्ध राहणार आहेत. एक मतदान केंद्र संवेदनशील असून येथे केंदीय राखीव दल तैनात केले आहेत. तसेच येथे सूक्ष्म निरीक्षक राहणार आहेत. या केंद्रासह १६६ मतदान केंद्रावरील निवडणूक प्रक्रिया (मतदान अधिकारी तीन पर्यंतची) निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरुन थेट प्रक्षेपित होणार आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिसरातील निवडणूक अधिकारी कार्यालयातून मंगळवारी (ता.१९) निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना (भाप्रसे), तहसिलदार (किनवट) तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.शारदा चौंडेकर, तहसिलदार (माहूर) तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि किनवट नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.अजय कुरवाडे यांनी जीपीएस यंत्रणा बसविलेल्या वाहनाद्वारे मतदान पथके रवाना केली. याकरिता एस.टी. महामंडळाच्या बस ३८, स्कूल बस ८, क्रूझर २८, जीप ४ व ट्रॅक्टर १ अधिग्रहीत केली आहेत. जिल्ह्यातील ईतर विधानसभा मतदारसंघातून येथे आलेल्या ३७७ मतदान केंद्राध्यक्ष, ३७७ सहायक मतदान केंद्राध्यक्ष व ३७७ इतर मतदान अधिकारी एक व ३७७ इतर मतदान अधिकारी दोन अशा एकूण एक हजार पाचशे आठ आहे. यांना मास्टर ट्रेनर उत्तम कानिंदे व मल्लीकार्जून स्वामी यांनी संगणक चालक तथागत पाटील यांच्या साथीने एलईडी वॉलवर पॉवर पॉईंट प्रझेंटेशन द्वारे प्रशिक्षण दिले.

रमेश मुनेश्वर, रुपेश मुनेश्वर, सारंग घुले, फहीम खान, समशेर खान, गिरीश पत्की, प्रवीण पिल्लेवार, सुरेश पाटील, शेषराव पाटील, सूरज पाटील आदींसह सर्व ३७ मास्टर ट्रेनर्स यांनी क्षेत्रिय अधिकारी व सहायक क्षेत्रिय अधिकारी यांनी सर्वांना मतदान यंत्र हाताळणी प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह दिले.

**चोख पोलीस बंदोबस्त -**

८३- किनवट विधानसभा मतदार संघाचे बंदोबस्त प्रभारी अधिकारी तथा उप विभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस विभागाच्या वतीने मतदानासाठी उप विभागीय पोलिस अधिकारी २, पोलीस निरिक्षक २, सहायक पोलिस निरीक्षक व पोलिस उपनिरीक्षक १०, पोलिस अंमलदार ३६५, होमगार्ड ३२७ असे एकूण १४ अधिकारी, ७०६ पोलिस कर्मचारी (स्त्री -पुरुष), सीवोवाय १२ बीएन टीजीएसजी १/२ सेक्शन १ व बीएसएफ १ प्लॅटून यांचा चोख पोलिस बंदोबस्त उपलब्ध केला आहे.

गट विकास अधिकारी सुरेश कांबळे (माहूर) यांच्या समन्वयात सर्व फिरते व स्थानिक पथक, जगदीश पऱ्हाड यांच्या समन्वयात ८० सहायक व क्षेत्रिय अधिकारी, स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड तसेच नायब तहसिलदार मोहम्मद रफीक, रामेश्वर मुंडे, व्ही.पी. राठोड, राजकुमार राठोड, केलास जेठे आदींसह के.डी. कांबळे, डी.सी. भुरे, नितीन शिंदे, व्ही.टी. सूर्यवंशी, गोविंद पांपटवार, संदीप पाटील, प्रभू पानोडे, संतोष मुपडे, नामदेव धोंड, संदीप कदम आदिंसह विविध कार्यालयाचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, शिपाई व कोतवाल निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# निवडणुकीमुळे जिल्ह्यात तळीरामांचे वांदे

## एक - दोन नाही सलग ४ दिवस ड्राय - डे घोषित



राज्य उत्पादन शुल्कची करडी नजर ड्राय डे कालावधीत कोणत्याही प्रकारची मद्यविक्री होणार नाही, याकरिता राज्य उत्पादन शुल्क, विभाग व पोलीस विभाग यांची करडी नजर असणार आहे.
अवैध मद्यविक्री विषयी तक्रारी असल्यास टोल फ्री क्रमांकावर किंवा राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात संपर्क साधावा.
**प्रमोद सोनोने, अधीक्षक उत्पादन शुल्क विभाग**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, अहिल्यानगर :** महाराष्ट्रामध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी सायंकाळी सहा वाजेपासून मद्यविक्री बंद करण्यात आली आहे.

सोमवारी सायंकाळी प्रचाराची कालमर्यादा संपल्यापासून मद्यविक्री बंद झाली. मंगळवार, बुधवार व मतमोजणीच्या दिवशी ( १८, १९, २० व २३ नोव्हेंबर) एकूण ४ दिवस जिल्ह्यात ड्राय डे असणार आहे. निवडणूक आयोगाने तसे आदेश पारित केले आहेत.

सोमवारी प्रचार संपल्यानंतर सायंकाळी सहा वाजल्यापासून मद्यविक्रीवर बंदी लागू झाली. मंगळवार, दिनांक १९ नोव्हेंबरला मतदानाच्या आधीचा दिवस म्हणून संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद असेल. २० नोव्हेंबरला मतदानाच्या दिवशी ड्राय डे असणार आहे.

तर २३ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजता दिवस सुरू होतो, तेव्हापासून सायंकाळी सहा वाजेपर्यंत निवडणूक आयोग निकालाची घोषणा करत नाही, तोपर्यंत मद्यविक्री बंद असणार आहे.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. तसेच या कालावधीत विनापरवाना मद्यसाठा आढळून आल्यास, संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

दरम्यान, विधानसभा आचारसंहितेच्या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यात मागील ३३ दिवसांत अवैध दारू विक्री विरोधात ३९१ गुन्हे दाखल केले आहेत. आत्तापर्यंत २ कोटी ३३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ३९६ आरोपींना अटक केली आहे.

# जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांनी मतदान केंद्रांना दिली प्रत्यक्ष भेट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, मिरा भाईंदर :** भारत निवडणूक आयोग यांनी घोषित केल्याप्रमाणे महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४ च्या पार्श्वभूमीवर बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघात ५०३ मतदान केंद्रांवर प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्या अनुषंगाने जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी मनीषा जायभाये यांनी १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्रमांक ६४ - अवर लेडी ऑफ वेलंकनी स्कुल येथे दिव्यांग मतदान केंद्र, मतदान केंद्र क्रमांक ४१९ - ए.पी.इंटरनॅशनल स्कुल येथे महिला मतदान केंद्र, मतदान केंद्र क्रमांक १९५ - एस.एल.पोरवाल इंग्लिश हायस्कुल येथे युवा मतदान केंद्र या ३ विशेष मतदार केंद्रांबरोबरच शांतीनगर हायस्कूल येथील मतदान केंद्रांना भेट दिली.

सदर भेटीत मतदान केंद्रावर नियुक्त कर्मचारी PO, FPO, OPO १, २ व ३ यांना कामकाजासंदर्भात सूचना दिल्या. सदर भेटी प्रसंगी सहा. निवडणूक निर्णय अधिकारी राजकुमार घरत व मूलभूत व्यवस्थापन पथक प्रमुख नितीन मुकणे उपस्थित होते. मतदान केंद्र क्रमांक ४१९ - ए.पी.इंटरनॅशनल स्कुल येथील महिला मतदान केंद्र येथे नियुक्त मतदान कर्मचारी PO, FPO, OPO १,२,३ व पोलिस कर्मचारी या महिला कर्मचारी असणार आहेत.

भारत निवडणूक आयोग यांनी विकसित केलेल्या सक्षम ॲपद्वारे (SAKSHAM APP) वृद्ध व दिव्यांग मतदारांना त्यांच्या निवासस्थानापासून मतदान केंद्रावर आणणे व मतदानानंतर पुन्हा निवासस्थानी पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. तरी १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त वृद्ध व दिव्यांग मतदारांनी सक्षम ॲपवर (डअघडकअच् अझझ) नोंदणी करावी. व १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे. असे आवाहन १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघाचे मा. निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे यांनी केले आहे.

# जिल्ह्यामध्ये बोगस मतदान रोखण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेची करडी नजर



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, ठाणे :** जिल्ह्यामधील सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची सोय करण्यात आली असून, त्याचा नियंत्रण कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात असणार आहे. या ठिकाणांहून सर्व केंद्रांवर चालणाऱ्या मतदानाचे निरिक्षण केले जाणार आहे. कोणतेही बोगस मतदान होणार नाही, याबाबत सर्व मतदान केंद्राध्यक्ष आणि सर्व केंद्राध्यक्ष अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

पोलिस विभागाला देखील त्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. मतदान केंद्रांवर कोणत्याची स्वरुपाचे बोगस मतदान अथवा तोतयेगिरी आढळून आल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याबाबत पोलिस विभागाला आदेशित करण्यात आले आहे.तसेच जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये निर्भय, शांततापूर्ण आणि पारदर्शक वातावरणात निवडणूक होण्यासाठी जिल्हा निवडणूक प्रशासनाने करडी नजर ठेवली आहे.

जिल्ह्यात शांततापूर्ण, निर्भय वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात, असे आदेश निवडणूक निरीक्षकांनी दिले आहेत. निवडणूक निरीक्षकांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करप्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी केली असून, बोगस मतदान रोखण्यासाठी कडक उपाययोजना केल्या आहेत.

# थोडक्यात

## इंदिरा गांधी जयंतीदिनी नमुंमपा मुख्यालयात अभिवादन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१९, नवी मुंबई :** भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीदिनी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच याप्रसंगी उपस्थितांनी राष्ट्रीय एकात्मतेची सामूहिक शपथ ग्रहण केली. यावेळी समाज विकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, दत्ता काळे, सुचिता गीध, एनयूएचएम शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. शीदेवी गर्गेलवार आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## पारनेरच्या ग्रामपंचायतींच्या कामात अपहार झाल्याचा आरोप

### अन्यथा जिल्हा परिषदेसमोर आंदोलन करण्याचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, अहिल्यानगर :** पारनेर पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या कामांच्या शासकीय कपातीत मोठ्या प्रमाणात अपहार झाला असल्याचा आरोप करुन तातडीने कामांची दप्तर तपासणी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयास दिले. याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद समोर आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. पारनेर तालुक्यातील ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी, पारनेर पंचायत समितीचे अधिकारी यांनी संगणमत करून अनेक ग्रामपंचायतीत झालेल्या कामांच्या शासकीय कपातीमध्ये मोठ्या प्रमाणात अपहार केला असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. पारनेर पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायत मंजूर कामांची दप्तर तपासणी करण्यात यावी, पूर्ण झालेल्या कामांची तपासणी व्हावी, ती कामे पूर्ण झालेली असल्यास शासकीय कपाती करण्यात आलेल्या रकमेची दप्तर तपासणी ग्रामपंचायत निहाय करावी व दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात इंदिरा गांधी यांना अभिवादन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, यवतमाळ :** जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे भारताच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांची जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा करण्यात आला. यावेळी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्रीकांत उंबरकर, जिल्हा नियोजन अधिकारी मुरलीनाथ वाडेकर यांच्यासह अन्य अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी देखील प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## किमान तापमानात झपाट्याने घट, थंडीचा कडाका आता वाढणार



**दि.१९, नागपूर :** हवामान खात्याने गेल्या आठवड्यात राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा दिला होता. या आठवड्याच्या सुरुवातीलाच पावसाळी वातावरण निवळले असून किमान तापमानासह कमाल तापमानातही झपाट्याने घट होत आहे. त्यामुळे आता थंडीचा कडाका वाढणार हे निश्चित! हवामान खात्यानेही तसा अंदाज व्यक्त केला आहे. राज्यातील पावसाचे सावट आता दूर झाले आहे. काही भागातून तापमानात वेगाने घसरण सुरू झाली आहे. उत्तर महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढला आहे. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही किमान तापमानात घट होण्याचा अंदाज आहे. तर विदर्भात गेल्या आठवड्यापासूनच किमान तापमानात वेगाने घसरणीला सुरुवात झाली आहे. मधले दोन दिवस वगळता आता पुन्हा किमान तापमानासह कमाल तापमानात देखील घट होत आहे. महाराष्ट्रासह दक्षिण भारतात गेले काही दिवस पावसाचे सावट होते. मात्र, आता पावसासाठी असणारी स्थिती निवळली आहे. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा थंडी पाय घट्ट रोवू लागली आहे. राज्यातील गारठा वाढण्याचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. पश्चिम महाराष्ट्रात धुक्याचे प्रमाण वाढत आहे. प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढत आहे. किमान तापमान देखील वेगाने घसरत आहे. त्यामुळे येत्या काळात राज्यात गारठा आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला असून, ही थंडी टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्य व्यापताना दिसेल. विदर्भात गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यातील किमान तापमान १३.२ व १३.५ अंश सेल्सिअस इतके कमी झाले. तर वर्धा, चंद्रपूर, भंडारा या जिल्ह्यात कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस तर गोंदियात २९.२ व बुलढाण्यात ते २९.६ अंश सेल्सिअस इतके होते. नागपूर शहरात देखील ३०.८ अंश सेल्सिअस इतकी तापमानाची नोंद घेण्यात आली. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात किमान तापमान १३ अंश सेल्सिअस इतके कमी झाले आहे. मुंबई शहर आणि उपनगरांमध्येही पहाटेच्या वेळी आणि रात्री उशिरा हवेत गारवा जाणवण्यास सुरुवात झाली आहे. शीतलहरींनी खऱ्या अर्थाने परिणाम दाखवण्यास सुरुवात केल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, थंडी सुरू झाल्यानंतर श्वसनविकारातही वाढ होते. यंदा दिवाळीत फटाक्यांच्या प्रदूषणामुळे हवेची पातळी आधीच खालावली आहे. त्यात आता थंडीमुळे देखील श्वसनविकाराचा धोका उद्भवू शकतो. त्यामुळे आरोग्यावर होणारे दीर्घकालीन परिणाम पाहता नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.